**“अन्नधान्याच्या अनुदानातून बाहेर पडा”**
(Opt Out of Subsidy of foodgrains)
**योजना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये अन्नधान्याचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांकरिता राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अधापु-२०१६/प्र.क्र.१३९/ना.पु.२२**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १९ ऑक्टोबर, २०१६

**वाचा :- शासन निर्णय क्र. असुका-२०१६/प्र.क्र.१२५/नापु २२, दि. १३ ऑक्टोबर, २०१६.**

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनातर्फे घरगुती वापराच्या गॅसवर (Liquified Petroleum Gas) **“अनुदानातून बाहेर पडा”** (Opt Out of Subsidy) या नावाने योजना सुरु केली आहे. अनेक लाभार्थी या योजनेमध्ये समाविष्ट झाले आहेत, त्यामुळे शासनाची मोठ्या प्रमाणात अनुदानाच्या निधीची बचत झाली आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये दि. १ फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत विहित अटींनुसार पात्र असलेल्या अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना प्रतिशिधापत्रिका प्रतिमाह ३५ किलो व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो अन्नधान्याचा सवलतीच्या दराने लाभ देण्यात येत आहे. राज्यामध्ये सुरु असलेल्या शिधापत्रिकांच्या आधार सिडींगमुळे सदर योजनेअंतर्गत सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ घेण्याकरिता योग्य लाभार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

राज्यात सुरु असलेल्या शिधापत्रिकांच्या आधार सिडिंगमुळे योग्य व गरजू लाभार्थ्यांची निवड करण्याच्या दृष्टीने दि. १३.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये जिल्हानिहाय सुधारित इष्टांक देण्यात आला आहे. नवीन लाभार्थ्यांची निवड करताना दि. ३०.०९.२०१६ पर्यंतच्या सर्व शिधापत्रिकाधारकांना अंत्योदय अन्न योजनेत व प्राधान्य कुटुंबाच्या लाभार्थ्यांमध्ये इष्टांकाच्या मर्यादेत समाविष्ट करण्याबाबत सदर शासन निर्णयान्वये सूचित करण्यात आले आहे. राज्यातील १४ जिल्ह्यांमधील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांचे देखील आधार सिडिंग करण्यात येणार आहे. सदर आधार सिडिंगमुळे अपात्र, दुबार, स्थलांतरित, मयत इत्यादि लाभार्थ्यांना वगळण्यात येणार असले तरी पात्र लाभार्थ्यांमधील ज्या लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्य घेण्याची आवश्यकता नाही अशा लाभार्थ्यांनी स्वेच्छेने सवलतीच्या दराने अन्नधान्य घेण्याच्या योजनेमधून बाहेर पडण्याची तयारी दर्शविली तर अशा लाभार्थ्यांना मिळणारा सवलतीचा लाभ, जे गरजू लाभार्थी इष्टांच्या मर्यादेमूळे योजनेमध्ये समाविष्ट होऊ शकले नाहीत, अशा लाभार्थ्यांना मिळेल याद्दष्टीने **“अन्नधान्याच्या अनुदानातून बाहेर पडा”** (Opt Out of Subsidy of foodgrains) योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

तसेच सदर अधिनियमांतर्गत पात्र असलेल्या लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्याचा पुरवठा करण्याकरिता अन्नधान्याच्या खरेदीपोटी व सदर अन्नधान्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याकरिता अनुदानापोटी केंद्र शासनास व राज्य शासनास मोठ्या प्रमाणात आर्थिक भार सोसावा लागत आहे. वर नमूद केलेल्या लाभार्थ्यांपैकी ज्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्याची आवश्यकता नाही असे लाभार्थी या योजनेमध्ये समाविष्ट झाले तर शासनावर पडणारा आर्थिक भार कमी होईल. या सर्व बाबी विचारात घेता घरगुती वापराच्या गॅसप्रमाणे राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत सवलतीच्या दराने दिल्या जाणाऱ्या अन्नधान्याकरिता देखील **"अनुदानातून बाहेर पडा"** (Opt Out of Subsidy) योजना राबविण्याकरिता शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय :-

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत सवलतीच्या दराने अन्नधान्य देण्याकरिता शासनावर येणारा आर्थिक भार कमी होण्याच्या दृष्टीने तसेच योग्य व गरजू लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ मिळावा या उद्दिष्टासाठी **"अनुदानातून बाहेर पडा"** (Opt Out of Subsidy) ही योजना सुरु करण्याचा निर्णय याद्वारे घेण्यात येत आहे.

दि. १३.१०.२०१६ च्या शासन निर्णयामधील अनुक्रमांक (६) मध्ये नमूद केल्यानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ मिळण्याकरिता पात्र असलेल्या सर्व लाभार्थ्यांना, जर त्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ घेण्याची आवश्यकता नसेल तर सवलतीच्या दराने मिळणारे अन्नधान्य नाकारण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी "अनुदानातून बाहेर पडा" ही योजना याद्वारे कार्यान्वित करण्यात येत आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र असलेल्या लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने मिळणाऱ्या अन्नधान्याचा लाभ घ्यावयाचा नसल्यास व देशास बळकट करण्याच्या प्रक्रियेचा एक भाग व्हावयाचा असल्यास त्यांनी नव्याने घ्यावयाच्या शिधापत्रिका आणि अस्तित्वात असलेल्या शिधापत्रिकांकरिता mahafood.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नमुन्यामध्ये आपली संमती दर्शवून अर्ज संबंधित शिधावाटप कार्यालयाकडे सादर करावा.

सदर योजनेस प्रसार माध्यमांमार्फत व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी.

नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई तसेच सर्व जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये अन्नधान्याच्या बाबतीत सर्वसामान्य जनतेला **"अनुदानातून बाहेर पडा"** (Opt Out of Subsidy) या योजनेत सामील होण्याचे आवाहन करुन याबाबत जनजागृती करावी.

लाभार्थ्यांनी सदर योजनेमध्ये समाविष्ट होण्याकरिता सादर करावयाच्या अर्जाचा विहित नमुना क्षेत्रीय कार्यालयांनी जिल्हा संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावा. असा पर्याय उपलब्ध असल्याबाबत सर्व शिधावाटप दुकानांबाहेर फलक लावावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०१९१४३९५३५९०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Dinkar Pathak

Digitally signed by Mahesh Dinkar Pathak
DN: c=IN, o=All India Service, ou=Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Mahesh Dinkar Pathak
Date: 2016.10.19 14:43:14 +05'30'

**(महेश पाठक)**

**प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
५. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व विभागीय आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी
९. नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
१०. सर्व उपआयुक्त (पुरवठा)
११. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी
१२. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, जि. टी. हॉस्पीटल संकूल, मुंबई
१३. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
१५. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२, मुंबई
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, मुंबई
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
१८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, नागरी पुरवठा, लेखा परिक्षा मंडळ द्वारा - वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
१९. वित्त विभाग, व्यय-४, मंत्रालय, मुंबई
२०. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक
२१. सर्व उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२२. निवडनस्ती (कार्यासन ना.पु. २२)